**जिल्हा परिषद धुळे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धुळे आयोजित**

**शिष्यवृत्ती सराव परीक्षा क्रमांक 1**

**दिनांक – 05 डिसेंबर 2023 विषय :- पेपर क्रमांक 1 इयत्ता :- 8 वी**

1) 'सतत एकच कामात मग्न असल्यामुळे शिणवटा आला ' या वाक्यातील सर्व शब्दांमध्ये एकूण अकारांत अक्षरे किती ?

1) दहा 2) अकरा 3) बारा 4) नऊ

2) संधी प्रकारानुसार विसंगत असणारा पर्याय निवडा.

1) गिरीश 2) प्रत्येक 3) तपोबल 4) धारोष्ण

3) 'कबड्डी' हा खेळ खेळण्याकरीता दम आणी ताकद तेवड्याच प्रमानात आसणे अवश्यक ठरते' या वाक्यात किती अशुद्ध
शब्द आहेत.

1) सात 2) आठ 3) सहा 4) पाच

4) पुढीलपैकी आलंकारिक शब्दाचे योग्य अर्थ यानुसार जोडी असणारे पर्याय कोणते ?

( दोन अचूक पर्याय निवडा)

1) दीपस्तंभ - लठ्ठ मनुष्य 2) पंक्तिप्रपंच - भेदभाव करणे

3) पांढरा हत्ती - दुर्मिळ मनुष्य 4) मेतकूट - घनिष्ठ मैत्री

5) पुढील आकृतीत लपलेल्या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ कोणता 

?

1) पेचात सापडणे 2) अतिशय गर्व होणे

3) चढाओढ लागणे 4) नमस्कार करणे

6) 'दिव्याखाली अंधार' या म्हणीत आलेल्या अव्ययाचा प्रकार ओळखा.

1) उभयान्वयी अव्यय 2) शब्दयोगी अव्यय

3) क्रियाविशेषण अव्यय 4) स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय

7) पुढीलपैकी कोणत्या दोन पर्यायातील म्हणींचा अर्थ एकच आहे.

( अचूक उत्तराचे दोन पर्याय निवडा )

1) जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही.

2) सुंभ जळाला तरीही त्याचा पिळ जात नाही.

3) जेवीण तर तुपाशी नाहीतर उपाशी
4) टाकीचे घाव सोसल्याशिवाय देव पाणी येत नाही.

8) पुढीलपैकी कोणत्या शब्दसमूहात संख्या विशेषण आहे.
1) विद्वान माणूस 2) उंच झाड
3) दाट हिरवळ 4) अर्धा तुकडा

9) 'परिकथा' या शब्दाचे योग्य सामान्य रूप कोणते ?
1) परीकथा 2) परिकथे
3) परीकथे 4) परिकथा

10) पुढीलपैकी अकर्मक कर्तरी प्रयोगाची उदाहरणे असलेले पर्याय निवडा. ( अचूक दोन पर्याय निवडा )
1) घार आकाशात झेपावली 2) मधुने घंटा वाजवली
3) तो सकाळी लवकर उठला 4) शेतकऱ्याने शेत नांगरले

11) पुढीलपैकी योग्य विरामचिन्हे वापरलेले वाक्य ओळखा.
1) मी शाळेत गेलो, परंतु शाळेला सुट्टी होती.
2) मी शाळेत गेलो ; परंतु शाळेला सुट्टी होती !
3) मी शाळेत गेलो परंतु ! शाळेला सुट्टी होती.
4) मी शाळेत गेलो ; परंतु शाळेला सुट्टी होती.

12) लिंगप्रकारानुसार भिन्न लिंग असणारा पर्याय निवडा.
1) शेळी 2) तळी
3) विळी 4) कळी

13) पुढीलपैकी चुकिचा पर्याय निवडा.

1) ( U – U ) जनास 2) ( - - - ) मानावा

3) (U - - ) यमाचा 4) ( U - - ) समरा

14) आत्माराम रावजी देशपांडे यांचे टोपण नाव काय ?

1) बालकवी 2) गोविंदाग्रज

3) कुसुमाग्रज 4) अनिल

15) पुढील ओळीतील क्रियापदाचा अर्थ ओळखा.

मुलांनो , सर्वांनी रांगेत उभे राहा.

1) स्वार्थ 2) विध्यर्थ 3) आज्ञार्थ 4) संकेतार्थ

16) पुढिलपैकी कोणत्या पर्यायातील सामासिक शब्दाचा विग्रह योग्य नाही.

1) सुर्योदय – सूर्याचा उदय　　2) जीवनवृक्ष –जीवनरुपी वृक्ष

3) ज्ञानामृत – अमृताचे ज्ञान　　4) अमृतवाणी – अमृतासारखी वाणी

17) निरपेक्ष हा शब्द पुढीलपैकी कोणत्या शब्दसमूहाला लागू पडतो ?

1) अपेक्षा बाळगणारा　　2) कसलीही अपेक्षा नसणारा

3) अपेक्षा नोंदवणारा　　4) आक्षेप दूर करणारा

18) अयोग्य जोडी ओळखा.

1) बालकवी - त्र्यंबक बापूजी ठोंबरे　　2) केशवकुमार - कृष्णाजी केशव दामले

3) विनायक - विनायक जनार्दन करंदीकर　4) रानकवी - ना.धो.महानोर

19) पुढे दिलेल्या कोणत्या पर्यायातील शब्दांची जोडी परस्पर विरुद्धार्थी शब्दांची आहे.

1) कसब - कौशल्य　　2) स्पर्धा - चढाओढ

3) तलवार - समशेर　　4) जहाल - मवाळ

**प्रश्न 20 ते 22 साठी सूचना –**

**खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित त्याखाली विचारलेले प्रश्नांची उत्तरे पर्यायातून निवडा –**

संवेदनशील माणसाचे मन इतरांची सुखदुःखे सहज जाणू शकते. इतरांना झालेल्या लहानशा वेदनेनेही त्याचे मन कळवळते. या वृत्तीमुळेच माणसांची हृदये जोडली जातात. माणसे एकमेकांच्या सुखदुःखात वाटेकरी होतात. एकमेकांसाठी त्याग करायला तयार असतात त्यामुळे आपुलकीची भावना निर्माण होते. समाजात आनंदमय वातावरण असण्यासाठी सर्वांच्या मनात एकमेकांविषयी आपुलकीची भावना निर्माण व्हायला हवी. त्यामुळे द्वेष,मत्सर,हिंसा, क्रोर्य , स्वार्थ
इत्यादी विघातक भावना अशा व्यक्तींची तीव्रता आपोआप नाहीशी होईल. माझ्याप्रमाणेच समोरच्या माणसालाही भाव भावना आहेत याची जाणीव निर्माण झाली की, माणसे एकमेकांशी प्रेमाने वागू
लागतात.

20) दुसऱ्यांची सुखदुःखे समजून घेण्यासाठी आपले मन कसे असावे?

1) दुःखी　　2) स्वार्थी

3) संवेदनशील　　4) आनंदमय

21) विधायक या शब्दाचा कोणता विरुद्धार्थी शब्द उताऱ्यात आलेला आहे.

1) आपुलकी　　2) तीव्रता

3) क्रोर्य　　4) विघातक

22) विघातक भावनांची तीव्रता नाहीशी कशी करता येईल?
1) एकमेकांविषयी मत्सर निर्माण झाल्यावर
2) दुसऱ्यांना वेदना दिल्यावर
3) एकमेकांविषयी आपुलकी निर्माण झाल्यावर
4) एकमेकांविषयी द्वेष व क्रौर्य निर्माण झाल्यावर

**प्रश्न 23 ते 25 साठी सूचना - पुढील सुसंगत वाक्यांचा परिच्छेद पूर्ण करण्यासाठी योग्य पर्याय निवडा.**

23) सध्या ..........................प्रमाण वाढले आहे.
1) अज्ञानाचे 2) अंधत्वाचे
3) वेठबिगारीचे 4) अपघातांचे

24) त्यासाठी ........................हे सर्वश्रेष्ठ दान करणे गरजेचे आहे.
1) ज्ञानदान 2) रक्तदान
3) अन्नदान 4) भुदान

25) त्यामुळे अनेक शस्त्रक्रिया यशस्वी होऊन एकमेकांना ..............मिळते.
1) अन्न 2) ज्ञान
3) नोकरी 4) जीवदान

26. 86.285 या संख्येतील उजवीकडील 8 ची स्थानिक किंमत डावीकडील 8 च्या स्थानिक किंमतीच्या किती पट आहे ?
(1) $10^{-3}$ (2) $10^{3}$ (3) $10^{2}$ (4) 100 पट

27. एका कोनाचा पूरककोन आणि कोटीकोन यांच्या मापांची बेरीज $150^0$ आहे. तर त्या कोनाचे माप किती ?

(1) $40^0$ (2) $50^0$ (3) $70^0$ (4) $60^0$

28. $X^2 + X - 72$ या राशीचे अवयव खालीलपैकी कोणते ?


(1) $(X + 8)(X - 9)$ (2) $(X + 8)(X + 9)$ (3) $(X - 8)(X - 9)$ (4) $(X - 8)(X + 9)$

29. 18.8 कि.मी. हे खालीलपैकी कोणत्या पध्दतीने लिहीता येईल ? (दोन अचूक पर्याय निवडा)

(1) 18 कि.मी. 5 मी. (2) 18 कि.मी. 800 मी. (3) 18800मी. (4) 18 कि.मी. 8 मी.

30. 4.25 चा सममूल्य अपूर्णांक लिहा ?

(1) $\frac{25}{4}$ (2) $\frac{17}{4}$ (3) $\frac{1}{4}$ (4) $\frac{4}{25}$

31. 

आकृतीत Δ ABC मध्ये ∠ A = $55^0$ ∠ B = $65^0$ तर ∠ ADC चे माप किती ?

B

(1) $110^0$ (2) $50^0$ (3) $120^0$ (4) $144^0$

32. सायकलच्या चाकाची त्रिज्या 14 सेमी आहे. तर चाकाच्या 30 फे-यांमध्ये ते चाक किती अंतर जाईल ?

(1) 2640 सेमी (2) 1760 सेमी (3) 1440 सेमी (4)1800 सेमी

33. $\sqrt[3]{0.000512}$ = किती ? (दोन अचूक पर्याय निवडा)

(1) 0.08 (2) 0.008 (3) 8 (4) $\frac{0.8}{10}$

34. $\frac{148}{138} \div \frac{120}{184} = ?$

(1) $\frac{45}{74}$ (2) $\frac{74}{45}$ (3) $1\frac{30}{45}$ (4) $\frac{1}{2}$

35. तीन कोटी दोन लक्ष तेवीस हजार तीनशे नव्व्यान्नव या संख्येनंतर येणारी क्रमिक संख्या कोणती ?

(1) 30223399 (2) 30223398 (3) 30223400 (4) 30223499


36. मिनीट काटा 12 वर असतांना वेळ पाहिली असता तास काटा व मिनीट काटा यांच्यात काटकोन तयार झालेला दिसला तर आणखी दीड तासांनी त्या दोन काट्यात किती मापाचा कोन होईल ? (दोन अचूक पर्याय निवडा)

(1) $45^0$ (2) $135^0$ (3) $165^0$ (4) $15^0$

37. 88 : 99 हे गुणोत्तर संक्षिप्त रुपात लिहा ?

(1) 9 : 8 (2) 8 : 9 (3) 11 : 9 (4) 8 : 11

38. चौकोन ABCD हा 14 सेमी बाजू असलेला चौरस आहे. आकृतीवरुन छायांकित भागाचे क्षेत्रफळ काढा.



(1) 84 चौसेमी (2) 42 चौसेमी (3) 14 चौसेमी (4) 140 चौसेमी

39. $\frac{a}{15} = \frac{1}{60}$ तर a ची किंमत किती ?


(1) 4 (2) $\frac{1}{4}$ (3) 90 (4) $\frac{4}{1}$

40. $\frac{x-7}{7} + \frac{x+4}{4} = 0$ तर X ची किंमत किती ?

(1) 28 (2) 0 (3) $\frac{28}{4}$ (4) 0.07

41. शेजारील आकृतीत दिलेल्या माहितीवरुन AFची लांबी किती ?
AB=25 , BC=23,CD=10,DE=20, FE=11

(1) 4 सेमी (2) 10 सेमी (3) 13 सेमी (4) 5 सेमी




42. एका चौरसाची परिमिती 120 मीटर आहे, तर त्या चौरसाचे क्षेत्रफळ किती ? (दोन अचूक पर्याय निवडा)

(1) 300 चौ.मी. (2) 900 चौ.मी. (3) 120 चौ.मी. (4) $9X10^2$ चौ.मी.

43. दुर्गेश परीक्षेत 585 गुण मिळवून उत्तीर्ण झाला. जर त्याला परीक्षेत 78% गुण मिळाले असतील तर ती परीक्षा किती गुणांची होती ?

(1) 600 (2) 750 (3) 500 (4) 800

44. $a^4 \times a^3 \times a^2 \times a = a^?$ किती ?

(1) 10 (2) 9 (3) 24 (4) 25

45. $m \alpha \frac{1}{n}$ आहे, जर m = 20 तर n = 4 या चलनाचे समीकरण लिहा ?

(1) n = 80m (2) m n = 5 (3) m n = 80 (4) m = 5n

46. माधुरीचा जन्म 11 मे 2007 ला शुक्रवारी झाला तर तिच्या 13 व्या वाढदिवशी कोणता वार असेल ?

(1) सोमवार (2) मंगळवार (3) रविवार (4) शनिवार


47. एका घनाकृतीचे एकूण पृष्ठफळ 486 चौ.मी. आहे, तर त्या घनाचे घनफळ किती ?

(1) 216 घ.मी. (2) 343 घ.मी. (3) 729 घ.मी. (4) 512 घ.मी.

48. $\frac{129}{23}$ ही संख्या कोणत्या प्रकारची संख्या आहे ? (दोन अचूक पर्याय निवडा)

(1) अपरिमेय (2) परिमेय (3) वास्तव (4) पूर्णांक

49. आकृतीत रेषा L ॥ रेषा M , रेषा N ही छेदिका आहे. तर ∠a व ∠b चे माप काढा ?




(1) $78^0, 92^0$ (2) $78^0, 78^0$ (3) $12^0, 78^0$ (4) $92^0, 12^0$

50. कोटीकोनांच्या मापांची बेरीज ------- असते ?

(1) $45^0$ (2) $80^0$ (3) $180^0$ (4) $90^0$

51. एका संख्येला 5 ने गुणण्याऐवजी 9 ने गुणले तर गुणाकार 48 ने वाढतो तर ती संख्या कोणती ?

(1) 12 (2) 13 (3) 11 (4) 14

52. रितेशजवळ एकूण 5 डझन वह्या होत्या, त्यापैकी ½ पट वह्या त्याने मयुरला व 1/5 पट वह्या प्रशांतला दिल्या तर रितेशजवळ किती वह्या शिल्लक राहिल्या ?

(1) 12 (2) 60 (3) 18 (4) 30

53. $\sqrt{3 X 4 X 5 X 6+1}$ = किती ?

(1) 41 (2) 21 (3) 19 (4) 91

54. 8 : 14 = 4 : x तर x = किती ?


(1) 6 (2) 8 (3) 7 (4) 32

55. L,X,V,D,C,M या रोमनसंख्या चढत्या क्रमाने लिहा ?

(1) V,X,L,C,D,M (2) M,D,C,L,X,V (3) V,X,C,D,L,M (4) V,X,L,D,M,C

56. शेजारील आकृतीत PR हा वर्तुळाचा व्यास असून PQ =3 सेमी , QR= 4 QR= 4 सेमी तर वर्तुळाची त्रिज्या किती? (दोन अचूक पर्याय निवडा)

(1) 2.5 सेमी (2) 8 सेमी (3) 6 सेमी (4) $\frac{5}{2}$ सेमी




57. $\frac{x^2+X-20}{(X+5)}=0$ असेल तर $X$ = किती ?

(1) 4 (2) -4 (3) 5 (4) -5

58. सकाळी 11.15 ला शाळेत आलेला कल्पेश शाळेतून 345 मिनीटांनी घरी जायला निघाला तर तो किती वाजता घरी जायला निघाला ?

(1) सायं.5.30 (2) सायं.5.00 (3) सायं.6.00 (4) सायं.5.45

59. वैष्णवी दररोज अर्धा लिटर दूध विकत घेते. 50 रुपये प्रति लीटर दराने तिचे जानेवारी महिन्याचे दुधाचे बील किती रुपये होईल ?

(1) 930 रुपये (2) 1550 रुपये (3) 620 रुपये (4) 775 रुपये

60. एक अंकी मूळसंख्येतील अंक एकदाच वापरुन तयार होणा-या मोठ्यात मोठ्या संख्येची व लहानात लहान संख्येची बेरीज किती ?

(1) 5175 (2) 5157 (3) 9889 (4) 9999

61. 47698 या संख्येतील हजार व दशक स्थानच्या अंकांच्या स्थानिक किमतींची बेरीज आणि शतक व एकक स्थानच्या अंकांच्या किमतींची बेरीज यातील फरक किती ?

(1) 6584 (2) 6482 (3) 6428 (4) 5482

62. $\frac{(1.8+1.4)(6.5-3.3)-(2.25+0.25)(4.25-1.75)}{(6.5-3.3-2.5)(2.25+0.25+\ .2)} =$ किती ?

(1) 1 (2) 0 (3) 2.5 (4) 3.2

63. एका वर्तुळाकृती मैदानाचा परिघ 132 मीटर आहे. त्याच्या आतील बाजुला कडेने 7 मीटर जागा सोडून उरलेल्या भागात क्रिकेट खेळण्यासाठी हिरवळीचा भाग तयार केलेला आहे, तर हिरवळ नसलेल्या भागाचे क्षेत्रफळ किती ?

(1) 154 चौमी (2) 693 चौमी (3) 308 चौमी (4) 616 चौमी

64. 65654,65546,65465,65645,65456,65564 या संख्या चढत्या क्रमाने लिहील्यास दुस-या व तिस-या संख्यांची बेरीज किती ?

(1) 131029 (2) 131209 (3) 113029 (4) 121309

65. काटकोन त्रिकोण ABC मध्ये $\angle B = 90^0$ $\angle C = 60^0$ आणि BC = 7 सेमी तर कर्ण AC ची लांबी किती ?

(1) 14 सेमी (2) $3\sqrt{3}$ सेमी (3) $14\sqrt{2}$ सेमी (4) 21 सेमी

66. सोडवा . $(X-7)(X+5) = ?$

(1) $X^2 - 2X - 35$ (2) $X^2 + 2X - 35$ (3) $X^2 + 2X + 35$ (4) $X^2 - 2X + 35$

67. 6 मीटर X 30 सेंटीमीटर = किती ? (दोन अचूक पर्याय निवडा)

(1) 18000 चौसेमी (2) 1800 चौसेमी (3) 18 चौसेमी (4) 180चौ.मी.

68. एका संख्येला 15,11,आणि 12 ने भागले असता प्रत्येक वेळी 4 बाकी उरते तर ती संख्या कोणती ?

(1) 1324 (2) 2636 (3) 1976 (4) 660

69. एका आयताकृती हॉलची लांबी व रुंदी अनुक्रमे 8 मीटर व 6 मीटर आहे. त्या हॉलमध्ये 40 सेमी बाजू असलेल्या चौरसाकृती फरशा बसवायच्या आहेत तर त्या हॉलसाठी एकूण किती फरशा लागतील ?

(1) 200 (2) 400 (3) 300 (4) 150

70. खालील बहुपदींच्या गुणाकाराची कोटी किती ?

$(X^2 + 2X^6)\ (X^4 + 2X + 1)$

(1) 6 (2) 10 (3) 4 (4) 7

71. चार अंकी मोठ्यात मोठी विषम संख्या व चार अंकी लहानात लहान विषम संख्या यातील फरक किती ?

(1) 8888 (2) 8998 (3) 9999 (4) 8999

72. खालीलपैकी अशी संख्या शोधा जिचे वर्गमूळ व घनमूळ समान आहे ?

(1) 2 (2) 3 (3) 1 (4) 8

73. शिक्षकांकडे 1 रु.,२रु.,५रु.ची पुरेशी नाणी आहेत. त्यांना अभिषेकला 10 रु. सुट्टे द्यायचे आहेत तर ते 10 रु. किती प्रकारे देता येतील ?

(1) पाच प्रकारे (2) दहा प्रकारे (3)आठ प्रकारे (4)नऊ प्रकारे

74. एका गणिती यंत्रणेत जर अधिक (+) चिन्ह भागाकारासाठी व वजा (-) चिन्ह गुणाकारासाठी आणि भागिले (÷) चिन्ह बेरजेसाठी व गुणिले (X) चिन्ह वजाबाकीसाठी उपयोगात आणले जात असेल तर $(200+5\div25\div(20-5)\times10 = ?$

(1) 125 (2) 100 (3) 40 (4) 155

75. $(x^6 - 3x^2 + 1)$ या बहुपदीचे सहगुणक रुप कोणते ?

(1) (1,3,1) (2) (1,0,0,0,3,1) (3) (1,0,0,0,3,0,1) (4) (1,0,0,0,1,0,1)

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी)

## Pre Secondary Scholarship Examination (Std. 8th)

### सरावासाठी उत्तरपत्रिकेचा नमुना / Sample Answer Sheet For Practice

पुणे
विद्या गुरूणां गुरुः।

Centre No. : **PRE-PRINTED**
Seat No. : **PRE-PRINTED**
Medium : **PRE-PRINTED**
Block No. : **PRE-PRINTED**

प्रश्नपत्रिका संचकोड अचूक नोंदवावा ☐

प्रश्नपत्रिका संचकोड वर्तुळ अचूक रंगवावे

Ⓐ Ⓑ Ⓒ Ⓓ

संचकोड अचूक नोंदविलेबाबत पर्यवेक्षकाची स्वाक्षरी

1 2 3 4 5 6 7 8 9

ही वर्तुळे विद्यार्थी/पर्यवेक्षकाच्या वापरासाठी नाहीत.

**सर्वसाधारण सूचना :**

१. पेन्सिलने नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरली जाणार नाहीत.
२. प्रत्येक प्रश्नाच्या समोरील उत्तराचा योग्य पर्याय वर्तुळात नोंदविताना काळ्या किंवा निळ्या रंगाच्या बॉलपेनचाच वापर करावा.
३. 'दोन अचूक पर्याय निवडा' अशी सूचना दिलेल्या प्रश्नांच्या बाबतीत दोन्ही अचूक पर्यायाची वर्तुळे रंगविणे बंधनकारक आहे.
४. 'दोन अचूक पर्याय निवडा' अशी सूचना दिलेल्या प्रश्नाव्यतिरिक्त इतर प्रत्येक प्रश्नासाठी एकापेक्षा अधिक रंगविलेली वर्तुळे ग्राह्य धरली जाणार नाहीत.
५. एकदा रंगविलेले वर्तुळ बदलता येणार नाही.
६. खाडाखोड केलेल्या, अर्धवट भरलेल्या वर्तुळाच्या उत्तरास शून्य गुण दिले जातील.
७. उत्तरपत्रिकेस घडी घालू नये, स्टेपल करु नये तसेच उत्तरपत्रिकेवर खाडाखोड करु नये.
८. उत्तरपत्रिका फाटल्यामुळे अथवा खराब झाल्यामुळे उत्तरपत्रिकेत रंगविलेले पर्याय दिसत नसतील तर सदर प्रश्नांचे गुण दिले जाणार नाहीत. त्यासाठी उत्तरपत्रिका व्यवस्थितपणे हाताळावी.
९. या उत्तरपत्रिकेसोबत असलेली कार्बनलेस कॉपी विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या अंतिम निकालापर्यंत स्वतःकडे जतन करावी.

उत्तरे नोंदविण्याच्या योग्य पध्दती

① ● ③ ④
① ② ● ●

चुकीच्या पध्दती

Ⓧ ② ③ ④
① ② ③ ④
① ② ◉ ④
① ② ③ ④

| प्र.क्र. | उत्तरांचे पर्याय | प्र.क्र. | उत्तरांचे पर्याय | प्र.क्र. | उत्तरांचे पर्याय |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ① ② ③ ④ | 26 | ① ② ③ ④ | 51 | ① ② ③ ④ |
| 2 | ① ② ③ ④ | 27 | ① ② ③ ④ | 52 | ① ② ③ ④ |
| 3 | ① ② ③ ④ | 28 | ① ② ③ ④ | 53 | ① ② ③ ④ |
| 4 | ① ② ③ ④ | 29 | ① ② ③ ④ | 54 | ① ② ③ ④ |
| 5 | ① ② ③ ④ | 30 | ① ② ③ ④ | 55 | ① ② ③ ④ |
| 6 | ① ② ③ ④ | 31 | ① ② ③ ④ | 56 | ① ② ③ ④ |
| 7 | ① ② ③ ④ | 32 | ① ② ③ ④ | 57 | ① ② ③ ④ |
| 8 | ① ② ③ ④ | 33 | ① ② ③ ④ | 58 | ① ② ③ ④ |
| 9 | ① ② ③ ④ | 34 | ① ② ③ ④ | 59 | ① ② ③ ④ |
| 10 | ① ② ③ ④ | 35 | ① ② ③ ④ | 60 | ① ② ③ ④ |
| 11 | ① ② ③ ④ | 36 | ① ② ③ ④ | 61 | ① ② ③ ④ |
| 12 | ① ② ③ ④ | 37 | ① ② ③ ④ | 62 | ① ② ③ ④ |
| 13 | ① ② ③ ④ | 38 | ① ② ③ ④ | 63 | ① ② ③ ④ |
| 14 | ① ② ③ ④ | 39 | ① ② ③ ④ | 64 | ① ② ③ ④ |
| 15 | ① ② ③ ④ | 40 | ① ② ③ ④ | 65 | ① ② ③ ④ |
| 16 | ① ② ③ ④ | 41 | ① ② ③ ④ | 66 | ① ② ③ ④ |
| 17 | ① ② ③ ④ | 42 | ① ② ③ ④ | 67 | ① ② ③ ④ |
| 18 | ① ② ③ ④ | 43 | ① ② ③ ④ | 68 | ① ② ③ ④ |
| 19 | ① ② ③ ④ | 44 | ① ② ③ ④ | 69 | ① ② ③ ④ |
| 20 | ① ② ③ ④ | 45 | ① ② ③ ④ | 70 | ① ② ③ ④ |
| 21 | ① ② ③ ④ | 46 | ① ② ③ ④ | 71 | ① ② ③ ④ |
| 22 | ① ② ③ ④ | 47 | ① ② ③ ④ | 72 | ① ② ③ ④ |
| 23 | ① ② ③ ④ | 48 | ① ② ③ ④ | 73 | ① ② ③ ④ |
| 24 | ① ② ③ ④ | 49 | ① ② ③ ④ | 74 | ① ② ③ ④ |
| 25 | ① ② ③ ④ | 50 | ① ② ③ ④ | 75 | ① ② ③ ④ |

पर्यवेक्षकांनी स्वत: भरावे.

उपस्थित Ⓟ

अनुपस्थित Ⓐ

सोडविलेल्या प्रश्नांची संख्या

न सोडविलेल्या प्रश्नांची संख्या

एकूण प्रश्न संख्या

75

विद्यार्थ्याची स्वाक्षरी

पर्यवेक्षकाचे नाव : ..............................

स्वाक्षरी : ..............................